# कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे
## श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे-३७

जा.क्र.-नियमन/मालमत्ता/वारसनोंद/जा.सू./गाळा क्र.४६८/२७११ /२०२५-२६ दि.११/२/२०२६

## जाहीर सूचना

श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्ड गुलटेकडी पुणे येथील फळे भाजीपाला विभागातील गाळा क्रमांक ४६८ हा महंमद कासिम अब्दुलरहिम मनमाडवाले यांना नियमित शेतीमालाच्या ठोक व्यवसायासाठी भाडेपट्टयाने देणेत आला होता, त्यांचे दिनांक १४/५/१९९९ रोजी निधन झालेने सदर गाळ्यावर श्रीमती झरिना महंमद कासीम बागवान (मनमाडवाले) यांचे नावाची नोंद घेणेत आली, झरिना महंमद कासीम बागवान (मनमाडवाले) यांचे दिनांक ८/१०/२०१४ रोजी निधन झाले आहे. तसेच मोहम्मद कासिम अब्दुल रहमान बागवान यांनी त्यांचे हयातीत सन १९९८ मध्ये मे. महंमद कासिम ॲन्ड सन्स मनमाडवाले या नावाने कौटुंबिक भागीदारी स्थापन करून नोंदणीकृत केली होती. त्यानुसार सदर भागीदारी फर्मचे भागीदारी पत्र, भागीदारी बदलपत्र व भागीदारी निवृत्त पत्र तसेच रजिस्ट्रार ऑफ फर्मचे दाखल्यानुसार सदरची भागीदारी फर्म विसर्जित झाली आहे. महंमद कासिम अब्दुल रहमान बागबान यांना १) मोहम्मद आयुब कासिम बागबान २) असलम कासिम बागबान ३) अक्रम कासिम बागबान ४) आरिफ कासिम बागबान ५) अनिसा निसार शेख हे वारस असलेचे मा. न्यायालयाकडील वारसप्रमाणपत्र सादर केले आहे. महंमद कासिम अब्दुल रहमान बागबान व कै. झरिना महंमद कासीम बागवान यांचे वारसांपैकी त्यांची मुलगी वगळता सर्व मे. महंमद कासिम ॲन्ड सन्स मनमाडवाले या भागीदार पेढीचे भागीदार होते. त्यामुळे १) श्री. अक्रम कासिम बागवान २) श्री. असलम कासिम बागवान ३) श्री. आरिफ कासिम बागवान ४) अनिसा निसार शेख (लग्नापुर्वीचे नाव – कु. अनिसा कासिम बागवान) यांनी त्यांचा अविभक्त हिस्सा / वारसाहक्क तसेच मे. महंमद कासिम ॲन्ड सन्स मनमाडवाले या भागीदारी फर्म मधील भागीदार म्हणून असलेला हक्क / हिस्सा मोहम्मद आयुब कासिम बागबान यांचे लाभात नोंदणीकृत हक्कसोडपत्रान्वये सोडलेला आहे. त्यामुळे फळे भाजीपाला विभागातील गाळा क्रमांक ४६८ वरील झरिना महंमद कासीम बागवान (मनमाडवाले) यांचे निधनामुळे त्यांचे नाव कमी करून मोहम्मद आयुब मोहम्मद कासिम बागबान यांचे एकटयाचे नावाची वारसनोंद होणेकामी १) श्री. असलम कासिम बागवान (मुलगा) २) श्री. अक्रम कासिम बागवान (मुलगा) ३) श्री. आरिफ कासिम बागवान (मुलगा) ४) सौ. अनिसा निसार शेख (लग्नापुर्वीचे नाव – कु. अनिसा कासिम बागवान) (मुलगी) ५) श्री. मोहम्मद आयुब मोहम्मद कासिम बागबान (मुलगा) या वारसांनी या कार्यालयाकडे अर्ज सादर केलेला आहे.

तरी, सदर वारसनोंदीबाबत कोणाची काही तक्रार/हरकत असल्यास, दिनांक /२/२०२६ पावेतो कृषि उत्पन्न बाजार समिती पुणे यांचे कार्यालयामध्ये लेखी स्वरुपात कळवावे. त्यानंतर कोणतीही तक्रार/हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सचिव सभापती
कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे

<u>प्रत</u> -
विभाग प्रमुख
फळे-भाजीपाला विभाग.